सकाळ दि 23/02/2023

# चोरीला गेलेले ८० मोबाइल मिळाले परत

## सायबर शाखेची कार्यवाही; पोलिस अधीक्षकांच्या हस्ते वाटप

**नांदेड, ता. २२ (बातमीदार)** : शहर आणि जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणाहून आणि बाजारातून हरवलेले, गहाळ आणि चोरी झालेले तब्बल १२ लाख ८२ हजार नऊशे रुपयांचे ८० मोबाईल सायबर शाखेने हस्तगत केले. त्यानंतर त्याची शहानिशा करून संबंधितांना ते मोबाईल पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या उपस्थितीत देण्यात आले आहेत.

शहर आणि जिल्ह्यात आठवडी बाजार, बसस्थानक, रेल्वेस्थानक आदी सार्वजनिक ठिकाणाहून महागडे मोबाईल गहाळ, हरवले तसेच चोरी होत आहेत. त्यामुळे या मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सायबर शाखेचे पोलिस निरीक्षक नानासाहेब उबाळे यांना आदेशित केले होते. त्यानुसार सायबर सेलचे एक पथक आणि जिल्ह्यातील सर्व उपविभागाचे पथक तयार करून हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याची मोहिम राबविण्यात आली होती.



**नांदेड :** सार्वजनिक ठिकाणाहून चोरीला गेलेले मोबाइल सायबर शाखेने हस्तगत करून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संबंधिताना नुकतेच दिले.

या पथकाने तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अशा मोबाईलचा शोध वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन घेतला आणि ८० मोबाईल हस्तगत केले आहेत.

त्या मोबाईलचे एकत्रितरित्या वाटप करण्यात आले. तसेच ज्यांचे मोबाईल हरवले आहेत त्यांनी मोबाईलचे आयएमइआय क्रमांकाची खात्री करून घेऊन जाण्याचे आवाहन सायबर सेलकडून करण्यात आले आहे.

सदरील कार्यवाही पोलिस अधीक्षक कोकाटे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, डॉ. खंडेराय धरणे, गृह विभागाचे पोलिस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, प्रशांत देशपांडे, नानासाहेब उबाळे, फौजदार जी. बी. दळवी, सोपान थोरवे, पोलिस अंमलदार सुरेश वाघमारे, राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, विलास राठोड, रेश्मा पठाण, अनिता नलगोंडे, दाविद पिडगे, दीपक शेवाळे, मोहन स्वामी, किशोर जैस्वाल, काशीनाथ कारखेडे, व्यंकटेश सांगळे, सौरभ सिद्धेवार आदींनी पार पाडली.

# पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. जाधव यांची होट्टल मंदिरास भेट

**देगलूर, ता.२२ (बातमीदार)** : नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. जय जाधव यांनी बुधवारी (ता.२२) रोजी देगलूर तालुक्यातील मौजे होट्टल येथे सदिच्छा भेट देऊन चालुक्यकालीन हेमाडपंथी मंदिराची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

चालुक्यकालीन शिल्पकलेचा हा ठेवा आपल्या पिढीसाठी अत्यंत मोलाचा असून गावकऱ्यांनी तो ठेवा जपला हे फार चांगले झाले. मराठवाड्याच्या अगदी टोकाला असलेले ही मंदिरे जगाच्या पाठीवर येण्यासाठी इनोस्कोशी जोडले जावेत अशी अपेक्षा गावकऱ्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. त्यावर डॉ. जय जाधव यांनी ही मंदिरे जगाच्या पाठीवर आली तरच राज्यासह देशातील पर्यटक येथे येऊन या भागाचा सर्वांगीण विकासाला मोठा हातभार लागेल. शिल्पकलेचा असलेला हा अलौकिक ठेवा पर्यटकांपर्यंत जायला हवा. पर्यटकांची वर्दळ वाढली की येथील रोजगाराच्या नवनवीन संधीही मोठ्या प्रमाणात निर्माण होतील. त्यातून या भागाचा सर्वांगीण आर्थिक विकास होईल असेही यावेळी बोलताना ते म्हणाले. हेमाडपंथी मंदिर परिसराची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले. या वेळी मंदिर समितीच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी डॉ. मिलिंद शिकारे, सरपंच प्रतिनिधी युसुफसेठ, माजी सरपंच शेषेराव सूर्यवंशी, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन सांगळे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक सोहन माछरे, मरखेलचे पोलिस निरीक्षक गीते, वाघमारे यांच्यासह गावकऱ्यांची या वेळी उपस्थिती होती.

या वेळी बासरी वादक ऐनोदिन वारसी यांच्या होट्टल वेनूवृंद ग्रुपने बासरी वादन करून उपमहानिरीक्षक डॉ. जय जाधव यांचे स्वागत केले. मंदिर परिसराची माहिती माजी सरपंच शेषेराव सूर्यवंशी यांनी देऊन उपस्थितांचे आभार मानले.



**देगलूर :** नांदेड परीक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. जय जाधव यांनी होट्टल येथे सदिच्छा भेट देऊन मंदिर परिसराची पाहणी केली.